# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

दिनांक 30 मे 1996.

उपरोक्त संस्थेच्या कार्यकारीणी मंडळाची सभा रविवार दिनांक 09 जून 1996 रोजी वीर कोतवाल उद्यान गार्डन, प्लाझा सिनेमा समोर, दादर येथे सायंकाळी ठीक 4:00 वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व कार्यकारीणी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**<u>सभेपुढील कामे</u>**

1. मागील सभेचे इतिवृत्त वाचून व त्यांस मंजूरी देणे
2. वाडीतील लोकोपयोगी कामे त्यावर चर्चा करणे
3. मा नामदार श्री नारायण तातू राणे व नवनिर्वाचित खासदार माजी केद्रीय उद्योगमंत्री यांचा सत्कार आयोजित करणे
4. चिटणीसांनी केलेल्या कामकाजाच्या अहवालास मंजूरी देणे
5. आर्थिक ताळेबंदास मंजूरी
6. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी इतर कामे.

श्री सुनिल सदानंद राणे
चिटणीस

# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : रविवार 09 जून 1996
**स्थळ** : कोतवाल उद्यान, प्लाझा सिनेमा समोर, दादर – पश्चिम, मुंबई – 400 028.

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री प्रताप विठोबा राणे | 3. श्री सुनिल सदानंद राणे |
| 2. श्री उदय भगवान राणे | |

उपरोक्त संस्थेची सभा रविवार दिनांक 09 जून 1996 रोजी वीर कोतवाल गार्डन येथे घेण्यात आली. सभेस वरील सभासद उपस्थित होते.

वरील ठिकाणी कोणीही कार्यकारी सभासद उपस्थित न राहिल्यामुळे अध्यक्षांनी असा ठराव मांडला की आपण प्रत्येक वेळी सभा बोलावून कार्यकारीणी सभासदास जर संस्थेबद्दल व त्याच्या कामाबद्दल आस्था नसेल तर राजीनाम देणे अती उत्तम. या बाबतीत उपस्थितांचे एकमत झाले. परंतू राजीनामा पत्र पाठविण्यापूर्वी जेष्ठ सभासदांच्या कानी हि गोष्ट जाणे आवश्यक आहे. त्यानुसार माजी अध्यक्ष श्री वासूदेव बाबू राणे यांच्या रुमवर सायंकाळी 6:30 वाजता भेट घेतली व त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली. त्यांनी असा सल्ला दिला / इच्छा प्रकट केली की राजीनामा देण्यापूर्वी नियोजित सत्कार समारंभ घडवून आणावा व त्यानंतर राजीनामा द्यावा अशी माझी इच्छा आहे. तसेच शाळेच्या लाईट बद्दल व शाळा संस्थेच्या नावावर (जमीन) करावी ही कामे पूर्ण होताच राजीनामा द्यावा.

संस्थेच्या अध्यक्षांनी ही गोष्ट नमुद केली की आम्हाला वाडीबद्दल, कामाबद्दल फार आस्था आहे परंतू पाठींबा नसेल तर फक्त खुर्चीस चिटकून राहणे सयुक्तीक वाटत नाही. तसेच वाडीतील कामासाठी ग्रामपंचायत व इतर खाती यांच्याशी माझा सतत संपर्क असतो.

---